# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट १९७-२२ दिनांक: ०१-०७-२२

## ०१ गावठी कट्टा, जिवंत काडतुस व खाली केस (पुंगळी) सह एक आरोपी गजाआड - पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

दि.३०/०६/२०२२ रोजी २१.४० वा.चे सुमारास वलईपाडा, संतोषभुवन, नालासोपारा (पु.), ता. वसई, जि.पालघर येथे एका इसमाने त्याचे कब्जात विनापरवाना व बेकायदेशिररित्या अग्निशस्त्र बाळगले असल्याची खात्रीशिर बातमी पेल्हार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकास मिळाली. मिळालेल्या बातमीची शहानिशा करुनणेकामी गुन्हे प्रकटीकरण पथक वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली शिताफिने घटनास्थळी रवाना झाले व संशयित असलेल्या इसमास ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या इसमाकडे विचापुस करता, त्याने त्याचे नाव सुरज शर्मा, रा. संतोषभुवन, नालासोपारा (पु.), मुळ रा. राज्य-उत्तरप्रदेश असे सांगितले तसेच घटनेच्या अनुषंगाने अधिक तपास करता तो राहत असलेल्या गाळयात खड्डा करुन पुरुन ठेवलेला एक गावठी कट्टा, एक जिवंत काडतुस व एक खाली केस (पुंगळी) असा एकुण-५,२००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल त्याने काढुन दिला असुन सदरचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाणे गु.रजि.नं. ।। ५६८/२०२२, भारतीय शस्त्र अधिनियम-१९५९ चे कलम-३, २५ प्रमाणे दि.३०/०६/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री.प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री.विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री.महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि/सुनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, किरण आव्हाड, बालाजी गायकवाड यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.



......oooo.......